सोबत तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलव्दारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी तसेच एनएसपी पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या संस्थाच्या KYC बाबतचे** पत्र क्रमांक तंशिसं/एनएसपी/संस्था-पत्र/२०२६-२७/५३२ दिनांक २९/०९/२०२६ सोबत जोडलेली आहे.कृपया त्याचे अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

क्र.विकाअ/शिक्षण/एनएसपी पोर्टल /२०२६/2711
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 05 OCT 2026

**प्रति,**

**प्राचार्य**, सर्व व्यावसायिक पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था अमरावती विभाग, अमरावती यांना सदर पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:** प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल - desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

तात्काळ :: स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे /संकेतस्थळ

क्र.१८/तंशिसं/एनएसपी/संस्थापत्र/२०२६-२७/५३२
दिनांक : २९ / ०९/२०२६

प्रति,
सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
( शासन मान्यताप्राप्त पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था )
महाराष्ट्र राज्य.

**विषय:- शै. वर्ष २०२६-२७ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी तसेच एनएसपी पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या संस्थाच्या KYC बाबत...**

संदर्भ: -१. केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.AICTE/StDC-SAG/Sch./Adv./२०२६-२७ दि.१९.०६.२०२६
२. एनएसपी पोर्टलवर सन २०२६-२७ करिता जाहीर करण्यात आलेल्या सूचना/ वेळापत्रक.

केंद्र शासनाच्या एनएसपी [ National Scholarship Portal ( NSP ) संकेतस्थळ : www.scholarships.gov.in )]पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने राबविल्या जात असलेल्या खालील योजनांच्या महाराष्ट्र राज्यातील अंमलबजावणीसाठी तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई हे नोडल ऑफीस घोषित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | सविस्तर माहितीसाठी संकेतस्थळ | विभाग / मंत्रालय |
|---|---|---|---|
| १. | टॉप क्लास शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना ( Scholarship for Top Class Education for students with Disabilities) | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी ( www.disabilityaffairs.gov.in ) | सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार |
| २. | प्रगती शिष्यवृत्ती योजना ( पदविका / पदवी ) [Pragati Scholarship Scheme ( Diploma /Degree )] | विद्यार्थीनींसाठी ( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ३. | सक्षम शिष्यवृत्ती योजना ( पदविका /पदवी ) [Saksham Scholarship Scheme ( Diploma /Degree )] | दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी ( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |
| ४. | स्वनाथ शिष्यवृत्ती योजना ( पदविका /पदवी ) [Swanath Scholarship Scheme Diploma /Degree )] | • अनाथ विद्यार्थ्यांसाठी किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोघेही किंवा दोघांपैकी एक कोविड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी<br>• ज्या विद्यार्थ्यांचे पालक गंभीर, जीवन धोकादायक आजाराने पिडित आहेत (जसे कॅन्सर इ.) / अपघातात मृत्यू पावले आहेत किंवा गंभीर अपंग (८०% पेक्षा जास्त) आहे अशा विद्यार्थ्यांसाठी<br>( www.aicte-india.org ) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, (AICTE) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | पदव्युत्तर पदवी अभ्यासासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती [National Scholarship for Post Graduate Studies] | • विश्व विद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली (UGC) यांनी वेळोवेळी निर्दिष्ट आणि अधिसूचित केलेल्या, भारतातील विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेमध्ये, मान्यता प्राप्त पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे पूर्णवेळ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी युजीसीची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या अभ्यासासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती<br>• सदर शिष्यवृत्तीसाठी योजनेअंतर्गत अटी व शर्तींच्या अधीन राहून, विद्यार्थ्यांची वयोमर्यादा ३० वर्षांपेक्षा कमी असणे गरजेचे. (https://www.ugc.gov.in/Scholarships) | विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) |

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी, केंद्र शासनाकडून, एनएसपी पोर्टलवर उपरोक्त योजनांसाठी विद्यार्थ्यांकडून योजनांचे अर्ज भरण्याचे व संस्था स्तरांवरुन विद्यार्थ्यांच्या अर्जांच्या तपासणीबाबतचे जाहीर करण्यात आलेले वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| वरील योजनांसाठी, विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याचे व संस्थेने अर्ज तपासणीचे वेळापत्रक : शै. वर्ष २०२६-२७ | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कार्यवाही | अंतिम दिनांक |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे. | ३१ ऑक्टोबर, २०२६ |
| २ | संस्थांनी ऑनलाईन अर्जांची तपासणी (मंजूर / नामंजूर) करणे | १५ नोव्हेंबर, २०२६ |
| **टीप :: केंद्र शासनाकडून वेळापत्रकात काही बदल झाल्यास सदर बदल एनएसपी पोर्टलवर ( संकेतस्थळ - www.scholarships.gov.in ) जाहिर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.** | | |

तरी सर्व संस्थांना कळविण्यात येते की, एनएसपी पोर्टलवर योजनांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून संस्थांनी त्यांच्या संस्थांमध्ये शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना, केंद्र शासनाकडून शै. वर्ष २०२६-२७ साठी, एनएसपी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रक / सुचनांनुसार, एनएसपी पोर्टलवरील उपरोक्त योजनांच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज ( नवीन / नुतनीकरण ) एनएसपी पोर्टलवर दिलेल्या मार्गदर्शक सूचना , FAQ , युझर मॅन्युअलचा वापर करुन अर्ज भरण्याबाबत कळविण्यात यावे.

तसेच, संस्थांनी NSP पोर्टलच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्राप्त झालेले अर्ज प्रलंबित न ठेवता पोर्टलवर नमूद अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईनरित्या तपासणी (मंजूर / नामंजूर) करावी.

**तसेच,विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांसाठी कोणत्याही एकाच पोर्टलचा लाभार्थी असेल याबाबतची संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी आणि जर संस्थांनी, विद्यार्थ्यांचा दोन्ही पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज मंजूर करुन, लाभ प्राप्त करुन घेतल्यास त्या संबंधित संस्था प्रमुखावर कारवाई करण्यात येईल याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

➢ *एनएसपी पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या संस्थाच्या KYC अनिवार्य करण्यात आलेले असून त्याबाबत संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.*

१. National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलवरील नोंदणी झालेल्या व KYC status - Approved असलेल्या संस्थाचे Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer (INO) चे Face Authentication अनिवार्य केले आहे. Face Authentication पूर्ण झाल्यानंतरच संस्थाचे Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer (INO) यांना त्यांच्या Login credential चा वापर करुन एनएसपी पोर्टलवर असलेल्या योजनांबाबतची कार्यवाही करता येईल. (जसे, विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची तपासणी करणे इ.) त्याबाबतची माहिती एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेली आहे. संस्थांनी त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

२. मागील वर्षी National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलवरील नोंदणी झालेल्या व KYC status - Approved असलेल्या ज्या संस्थांनी Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer (INO) चे Biometric Authentication (बायोमॅट्रीक प्रमाणीकरण ) / Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्या संस्थांचे Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer (INO) यांना Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता नाही. परंतु जर संस्थांनी संस्थांचे Head of Institute ( HOI ) किंवा Institute Nodal Officer (INO) किंवा दोन्हीचे National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलवरील तपशीला मध्ये बदल करुन घेतला असेल तर त्यांना Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. तसेच,

३. संस्थांच्या National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलवरील नोंदणी झालेल्या ज्या Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer (INO) यांनी त्यांच्या आधार कार्डवरील तपशीलामध्ये बदल केला असेल तर,एनएसपी पोर्टलवर माहिती अद्ययावत करुन घेऊन, त्यांना पुन्हा Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

४. Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी NSP Face Auth App व Aadhar Face RD App (only available for Android devices) मोबाईलमध्ये Google Play Store द्वारे डाऊनलोड करावी व तद्नंतर त्या App द्वारे Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी.

५. Face Authentication प्रक्रियेच्या वर्कफ्लोनुसार जोपर्यंत पोर्टलवर नोंदणी झालेल्या संस्थेच्या Institute Nodal Officer ( INO ) चे Face Authentication होणार नाही, तोपर्यंत Head of Institute ( HOI ) चे Face Authentication करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी, या पत्राद्वारे सर्व संबंधित संस्थांना सुचित करण्यात येते की, KYC status - Approved परंतु INO's BioAuth Status :- Not Done / HOI's BioAuth Status:- Not Done असलेल्या शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी, तसेच, KYC status - Not Approved असलेल्या शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी सोबत जोडलेल्या Annex-A प्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. प्रमोद अ. नाईक.)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत - यांना माहितीसाठी सादर.

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई
२. मा. सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला, मंत्रालय, मुंबई. ( Email id-desk6.mdd-mh@mah.gov.in )

प्रत - यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्यांच्या अधिनस्त मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या सर्व संबंधित संस्थांना सूचना देऊन कार्यवाही पूर्ण करुन घेण्याबाबत.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर. ( Email id - rooffice@dtemaharashtra.gov.in )
२. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ०१ ( Email id- dmercetcell@gmail.com , dmerps@gmail.com )
३. मा. संचालक, आयुष संचालनालय, चौथा माळा, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ०१. ( Email id- directorayurvedmaha@gmail.com )
४. मा. संचालक, कला संचालनालय, सर जे जे स्कुल ऑफ आर्ट कॅम्पस, डॉ. डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई-०१. ( Email Id - dirdoa.mum_mah@gov.in )
५. मा.संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, ४१२, शिवाजी नगर, पुणे- ४११ ०१६.
६. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे - ४११ ०३७. ( Email Id- edn_mcaer@rediffmail.com , mcaer@rediffmail.com, jtdirector_admin@mcaer.org )

## Annex-A

शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी KYC status - Approved परंतु INO's BioAuth Status :- Not Done / HOI's BioAuth Status:- Not Done आणि शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी KYC status - Not Approved असलेल्या संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

NSP पोर्टलवर Home Page -> Public Corner--> अंतर्गत देण्यात आलेल्या Find Institute on NSP अंतर्गत Search now द्वारे Institute State , Institute District , Institute/College /ITI नमूद करुन किंवा "Search By AISHE/DISE/ITI(NCVT) Code in AISHE/DISE/ITI(NCVT) Code Master" पर्यायाचा वापर करुन व त्यानुसार संस्थेची माहिती भरुन एनएसपी पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या संस्थाच्या यादीमध्ये संस्थेच्या KYC status - Approved परंतु INO's BioAuth Status :- Not Done / HOI's BioAuth Status :- Not Done किंवा KYC status -Not Approved आहे याबाबतची माहिती जाणून घ्यावी व तद्नंतर,

संस्थेने KYC status - Approved असेल तर खालील A ( KYC status- Approved ) अंतर्गत दिलेल्या सुचनानुसार व KYC status - Not Approved असेल तर खालील B ( KYC status -Not Approved ) अंतर्गत देण्यात आलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

**C. KYC status - Approved परंतु INO's BioAuth Status :- Not Done / HOI's BioAuth Status:- Not Done असलेल्या संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

१. केंद्र शासनाकडून Face Authentication (FaceAuth) द्वारे Biometric Authentication ची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी, एनएसपी पोर्टलवर नोंदणी असलेल्या परंतु संस्थांचे Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) यांची Biometric Authentication ची प्रक्रिया प्रलंबित असलेल्या संस्थाचे HOI / INO (याआधी Biometric Authentication / Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण केलेल्या संस्था वगळून ), यांनी Face Authentication (FaceAuth) द्वारे Biometric Authentication ची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी NSP Face Auth App व Aadhar Face RD App (only available for Android devices) मोबाईलमध्ये Google Play Store द्वारे डाऊनलोड करावी व तद्नंतर त्या App द्वारे Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी.

२. Face Authentication प्रक्रियेच्या वर्कफ्लोनुसार जोपर्यंत पोर्टलवर नोंदणी झालेल्या संस्थेच्या Institute Nodal Officer ( INO ) चे Face Authentication होणार नाही, तोपर्यंत Head of Institute ( HOI ) चे Face Authentication करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. एनएसपी पोर्टलवर KYC status - Approved असलेल्या ज्या संस्थांना यापूर्वी नोंदणी झालेल्या Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO) यापैकी एक किंवा दोघेही जर संस्था सोडून गेले असतील /सेवानिवृत्त झाले असतील किंवा सध्या संस्थेत कार्यरत नसतील तर अशा संस्थांनी एनएसपीवर पोर्टलवर पूर्वी नोंद असलेल्या परंतु संस्थेत कार्यरत नसलेल्या HOI / INO यांच्या जागी, सध्या संस्थेत नव्याने कार्यरत HOI / INO चे नाव अद्ययावत करण्यासाठी, त्यांचे HOI / INO यांची आधार क्रमांक, आधार कार्डशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक, आधार कार्डवर असलेले नाव व आधार कार्डवर असलेली माहिती ( Gender, Date of Birth etc. ) जशीच्या तशी सोबत जोडलेल्या Annex-1 मधील तक्त्यामध्ये भरुन यांच्या आधार कार्डच्या छायांकीत प्रतीसह संस्थेच्या लेटरहेडवर संस्थेचे HOI / INO किंवा दोन्ही यांचे बदल करण्याबाबतचे कारण स्पष्टपणे नमूद करुन "संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१ " या पत्यावर तात्काळ पाठवून ( संस्थांनी माहिती ईमेलद्वारे पाठवू नये, ती ग्राहय धरण्यात येणार नाही.) किंवा संस्थेच्या दूतामार्फत जमा करुन एनएसपी पोर्टलवर माहिती अद्ययावत करुन घ्यावी व सदरची माहिती एनएसपी पोर्टलवर अद्ययावत झाल्यानंतर संबंधित HOI / INO यांनी Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी.

सूचना :: Annex-1 मधील तक्त्यामध्ये काही संस्थाकडून Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) यांची माहिती देताना आधार कार्डवर Dr./Mr./Mrs./Ms. असे prefix नमूद नसतानाही prefix लावून माहिती देण्यात येते, तसेच काही संस्थाकडून आधार कार्डवर जे मोबाईल नंबर लिंक आहे / आधार कार्डवर जी Date of

Birth नमूद आहे ती माहिती न देता, आधार कार्डवर नमूद नसलेली माहिती देण्यात येते. जेणेकरुन संबंधित संस्थेची माहिती एनएसपी पोर्टलवर अद्ययावत करता येत नाही. तरी एनएसपी पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्यासाठी, अचूक माहिती Annex-1 मधील तक्त्यामध्ये भरुन देण्यात यावी. Annex-1 मधील तक्त्यामध्ये चुकीची माहिती दिलेल्या संस्थेची दखल घेतली जाणार नाही याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

४. मागील वर्षी National Scholarship Portal ( NSP ) पोर्टलवरील नोंदणी झालेल्या व KYC status - Approved असलेल्या ज्या संस्थेच्या Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) Biometric Authentication ची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जर Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) यांनी आपल्या आधार कार्डमधील माहिती ( जसे नाव, DOB , पत्ता इ.) अद्ययावत केली तर त्यांचे लॉगीन होणार नाही व Face Authentication ची प्रक्रिया पुन:श्च करावी लागेल.

D. KYC status - Not Approved असलेल्या संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रम ( पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ) चालविणाऱ्या व All India Survey on Higher Education Code (AISHE code) असलेल्या सर्व संबंधित संस्थांनी,

१. NSP पोर्टलवर Home Page -> Institute Corner-> How to Fill Registration Form अंतर्गत दिलेल्या सुचनानुसार, संस्थाचे Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) चा तपशील भरुन Institute KYC Registration Form संपूर्ण भरावा.तसेच,

२. संस्थाचे Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) यांनी Face Authentication साठी NSP Face Auth App व Aadhar Face RD App (only available for Android devices) मोबाईलमध्ये Google Play Store द्वारे डाऊनलोड करावी व तद्नंतर त्या App द्वारे Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण करावी.

३. NSP पोर्टलवर Institute KYC Registration Form भरुन जमा केल्यानंतर, पोर्टलवर उपलब्ध झालेल्या Print Option चा वापर करुन, भरलेल्या Institute KYC Registration Form ची Print काढून त्यावर संस्थेचा स्टॅम्प सह Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांनी स्वाक्षरी करावी.

४. Institute Nodal Officer ( INO ) /Head of Institute ( HOI ) यांनी स्वाक्षरी केलेल्या Institute KYC Registration Form ची scanned copy एनएसपी पोर्टलवर दिलेल्या सुचनांनुसार Institute Nodal Officer ( INO ) यांनी NSP पोर्टलवर अपलोड करुन Head of Institute ( HOI ) यांना त्यांच्या मोबाईलवर प्राप्त होणारा OTP भरुन जमा करावी. तद्नंतर,

५. Institute KYC Registration Form मंजूरीसाठी, संस्थेच्या लेटरहेडवर, Institute KYC Registration Form यापूर्वी मंजूर करुन घेतला नसल्याबाबतचे स्पष्ट कारण नमूद करुन सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये (Annex-2) माहिती भरावी व

६. संस्थेने उपरोक्त अनुक्रमांक ४ नुसार स्वाक्षरीसह अपलोड केलेले Institute KYC Registration Form व उपरोक्त अनुक्रमांक ५ नुसार संस्थेचे पत्र , Annex-2 मध्ये भरलेली माहिती,अद्ययावत असलेल्या AISHE code च्या Certificate छायांकीत प्रतीसह "संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१ " या पत्त्यावर तात्काळ पाठवून ( संस्थांनी माहिती ईमेलद्वारे पाठवू नये, ती ग्राहय धरण्यात येणार नाही.) किंवा संस्थेच्या दूतामार्फत जमा करुन मंजूर करुन घेण्यात यावे.

७. स्टेट नोडल ऑफीसरकडून Institute KYC Registration Form मंजूर झाल्यानंतर, संस्थेच्या Head of Institute ( HOI ) व Institute Nodal Officer ( INO ) यांना Institute KYC Registration Form मध्ये नोंदणी असलेल्या मोबाईल क्रमांकावर एनएसपी पोर्टलचे लॉगीन आयडी व पासवर्ड प्राप्त होणार आहेत. संस्थांनी लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन एनएसपी पोर्टलवर दिलेल्या सूचनानुसार, Institute Profile अद्ययावत करावी (उदा. संस्थेमध्ये चालू असलेले अभ्यासक्रम व लागू असलेले शुल्काची रक्कम इ.)

महत्त्वाची सूचना -एनएसपी पोर्टलवर, संस्थांनी Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) यांची Institute KYC Registration Form मध्ये नोंदणी करताना /अद्ययावत करुन घेताना Head of Institute ( HOI ) / Institute Nodal Officer ( INO ) कंत्राटी स्वरुपाचे नसतील याची दक्षता घ्यावी.

(Annex -1)

Information of Head of Institute ( HOI) / Institute Nodal Officer ( INO ) OR Both for updating the details on National Scholarship Portal [ Institute has to Fill the Information of whom the details is to be get Update ( ex.if Institute reuired to get update the information of HoI then institute has to fill the information of HoI only and not INO AND if Institute reuired to get update the information of INO then institute has to fill the information of INO only and not HoI AND if Institute reuired to get update the information of both HoI and INO then fill the information of Both )

Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code _ _ _ _ _

Institute District - _ _ _ _ _

DISE / AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) - _ _ _ _ _

DTE Code ( Only for that Inst. which comes under DTE ) - _ _ _ _ _

| Institite NSP. Login ID | Detail of Head of Institute ( HOI ) | | | | | | Detail of Institute Nodal Officer ( INO ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM/YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card | Reason of Updating /Changing of old registered HoI on NSP | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM/YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card | Reason of Updating /Changing of old registered INO on NSP |
| | | | | | | | | | | | | |

Date -

Name of Head of Institute -

Signature of Head of Institute -

Stamp of Institute -

(Annex -2)

Information of Head of Institute ( HOI) / Institute Nodal Officer ( INO ) for approving Institute KYC Registration Form or For Resetting the Password of Head of Institute ( HOI) /Institute Nodal Officer ( INO ) of National Scholarship Portal

Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code _ _ _ _ _

Institute District - _ _ _ _ _

DISE / AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) - _ _ _ _ _

DTE Code ( Only for that Inst. which comes under DTE ) - _ _ _ _ _

| Institute KYC Registration Form No. (Ex.MHXXXXXXXX) | Detail of Head of Institute ( HOI ) | | | | | Detail of Institute Nodal Officer ( INO ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM/YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card | Aadhaar Number | Name as on Aadhaar Card | Date of Birth (DD/MM/YYYY) | Gender | Mobile No.linked with Aadhaar Card |
| | | | | | | | | | | |

Date -

Name of Head of Institute -

Signature of Head of Institute -

Stamp of Institute -